www.PapaCambridge.com

UNIVERSITY OF CAMBRIDGE INTERNATIONAL EXAMINATIONS
General Certificate of Education Advanced Level

**MARATHI** **9688/04**

Paper 4 Texts **October/November 2012**

**2 hours 30 minutes**

Additional Materials: Answer Booklet/Paper

*4055472764*

**READ THESE INSTRUCTIONS FIRST**

If you have been given an Answer Booklet, follow the instructions on the front cover of the Booklet.
Write your Centre number, candidate number and name on all the work you hand in.
Write in dark blue or black pen.
Do not use staples, paper clips, highlighters, glue or correction fluid.

Answer any **three** questions, each on a different text. You must choose **one** question from Section 1, **one** from Section 2 and **one other**.
Write your answers in **Marathi** on the separate Answer Paper provided.
Dictionaries are **not** permitted.
You may **not** take set texts into the examination.
You should write between 500 and 600 words for each answer.
You are advised to divide your time equally between your answers.

At the end of the examination, fasten all your work securely together.
The number of marks is given in brackets [ ] at the end of each question or part question.

**सर्वप्रथम खालील सूचना वाचा**

तुम्हाला उत्तरपुस्तिका दिली असल्यास तिच्या मुखपृष्ठावरील सूचनांचे पालन करा.
उत्तरपुस्तिका व पूरक उत्तरपृष्ठांवर तुमचा परीक्षा केंद्र क्रमांक, अनुक्रमांक (रोल नंबर) व तुमचे नाव लिहा.
गडद निळ्या अथवा काळ्या पेनने लिहावे.
टाचणी अथवा टाचण्याची अन्य साधने, अधोरेखनासाठी रंगीत पेन, डिंक
किंवा दुरूस्तीसाठीची साधने वापरू नयेत.

कोणतेही **तीन** प्रश्न सोडवा. प्रत्येक प्रश्न हा वेगवेगळ्या पाठ्यपुस्तकांवर आधारित असावा.
विभाग 1 मधून **एक** प्रश्न, विभाग 2 मधून **एक** प्रश्न व **उरलेला एक** प्रश्न कोणत्याही विभागातून सोडवा.
उत्तरांसाठी देण्यात आलेल्या वेगळ्या पृष्ठांवर प्रश्नांची उत्तरे **मराठीत** लिहा.
शब्दकोशांचा उपयोग करण्यास **मनाई आहे.**
पाठ्यपुस्तके परीक्षेच्या वेळी नेता येणार **नाही.**
प्रत्येक उत्तर 500 ते 600 शब्दांच्या मर्यादेत असावे.
सर्व उत्तरांना समान वेळ द्यावा.

परीक्षेच्या शेवटी उत्तरांची सर्व पृष्ठे व्यवस्थित बांधावी.
प्रत्येक प्रश्नाच्या शेवटी अथवा उपप्रश्नांच्या शेवटी कंसात [ ] प्रश्नांचे गुण दिले आहेत.

This document consists of **5** printed pages and **3** blank pages.

DC (CW) 45453/1
© UCLES 2012

UNIVERSITY *of* CAMBRIDGE
International Examinations

**[Turn over**

www.PapaCambridge.com

## विभाग – 1

**1 संत ज्ञानेश्वर – सार्थ श्रीज्ञानेश्वरी – अध्याय अठरावा**
**(ओवी क्रमांक 1785 ते 1793)**

*काय बहु बोलो सकळां। मेळविलो जन्मफळा।*
*ग्रंथसिद्धीचा सोहळा। दाविला जो हा।।*
*मियां जैसजैसि आशा। केला तुमचा भरवसा।*
*ते पुरवूनि जी बहुवसा। आणिलों सुखा।।*
*मजलागी ग्रंथाची स्वामी। दुजी सृष्टी जे हे केली तुम्ही।*
*ते पाहोनि हांसों आम्ही। विश्वामित्रातेंही ।।*
*जे असोनि त्रिशंकुदोषे। धातयाही आणावे वोसे।*
*ते नासतें किजे कीं ऐसे। निर्मावे नाही।।*
*शंभू उपमन्यचेनि मोहे। क्षीरसागरूही केला आहे।*
*येथ तोही उपमे नोहे। जे विषगर्भ की।।*
*अंधकारू निशाचरां। गिळितां सूर्ये चराचरां।*
*धांवा केला खरा। ताउनी कीं तो।।*
*तातलियाही जगाकारणें। चंद्रें वेचिलें चांदणें।*
*तया सदोखा केवीं म्हणे। सारखे हें।।*
*म्हणौनि तुम्हीं मज संती। ग्रंथरूप जो हा त्रिजगतीं।*
*उपयोग केला तो पुढती। निरूपम जी।।*
*किंबहुना तुमचे केले। धर्मकिर्तन हें सिद्धी गेलें।*
*येथ माझे जी उरलें। पाईकपण।।*

**(अ) (i)** पसायदानात ज्ञानदेव कोणकोणत्या गोष्टींची मागणी करतात ?
**(ii)** आपल्या गुरूचे महत्त्व विशद करताना ते कोणकोणत्या उपमा वापरतात ?
**(iii)** ज्ञानदेव आपली गुरूपरंपरा कशाप्रकारे कथन करतात ? [25]

**अथवा**

**(ब)** अठराव्या अध्यायातील प्रतिपाद्य विषयाची सोदाहरण चर्चा करा. [25]

© UCLES 2012

www.PapaCambridge.com

**2** **संत तुकाराम – सार्थ श्री तुकारामाची गाथा**
**(अभंग क्रमांक 1363 ते 1365)**

*वेद जया गाती। आम्हां तयाची संगति।।*
*नाम धरियेले कंठी।अवघा सांठविला पोटीं।।*
*ओंकाराचे बीज। हाती आमुचे ते निज।।*
*तुका म्हणे बहु मोठे। अणुरेणुयां धाकुटें।।*

*तुम्ही तरी वो श्रीपती। माझी बहु हीन याती।।*
*दोघे असो एके ठायी। माझा माथा तुझे पायी।।*
*माझ्या दीनपणा पार। नाही बहू तूं उदार।।*
*तुका म्हणे पांडुरंगा। मी ओहोळ तूं गंगा।।*

*मी याचक तू दाता। काय सत्य पाहों आतां।।*
*म्यां तो पसरिला हात। करी आपुलें उचित।।*
*आम्ही घ्यावे नाम। तुम्हां समाधान काम।।*
*तुका म्हणे देवराजा। वाद खंडी तुझा माझा।।*

**(अ)** **(i)** ईश्वराविषयीची कोणती भावना तुकाराम महाराज व्यक्त करीत आहेत ?
**(ii)** 'मी ओहोळ तू गंगा' असे महाराज कां म्हणतात ?
**(iii)** हरिनामछंदाचे कोणते परिणाम तुकोबा सांगतात ? [25]

**अथवा**

**(ब)** संत तुकारामांच्या भक्तिपर अभंगांचे वेगळेपण अभ्यासक्रमातील अभंगांच्या आधारे स्पष्ट करा. [25]

© UCLES 2012

www.PapaCambridge.com

**3** **बा.भ.बोरकर – कविता – सांजवेळ**

*सूर्य गेला देशांतरा आणि दिशा अंधुकली*
*पंख–दमल्या पक्ष्यांची भिरीं घरा परतली*
*नभाचिया नुरेवर रंग विटुनी उल्हासी*
*त्याचा गाभा गढूळला स्पष्ट दिसे कासाविशी*
*तरूगिरीचिया ओळी कुणी फांसल्याशा वाटे*
*तप्त सावळया भूमीचा कोंडलेला श्वास सुटे*
*श्रांत कोलाहल टाकी वायुचिया स्कंधी मान*
*सिंधुतीरी घ्यावयाला सांजवेळ–समाधान*
*सांध्यजळ व्याकुळलें तम पाहुनी गहन*
*चुळबुळे, खळबळे भाव होईना सहन*
*भव्य नौकांतले दीप स्तब्ध सावधान झाले*
*त्यांस देखुनी जळाचें खिन्न काळीज हाललें*
*तेजोरेषा थरारल्या त्याच परी काळजांत*
*आणि तया पाहुनीयां दीप जहाले स्तिमित*
*दूर कुठूनसा आला गूढ घंटारव कानीं*
*मंत्रमुग्ध माझी वृत्ती, भुके मन, मुकी वाणी*

**(अ) (i)** कवितेतून व्यक्त होणारे कविमन कोणत्या ओळींमधून दिसून येते ?

**(ii)** दुःख आणि उदासीच्या कोणत्या प्रतिमा कवितेत येतात ?

**(iii)** प्रस्तुत कवितेचे आशयसूत्र आणि अनुप्रासोक्त सौंदर्य विशद करा. [25]

**अथवा**

**(ब)** संध्याकाळच्या वर्णनातील विविध सौंदर्यस्थळे उलगडून दाखवा. [25]

© UCLES 2012

www.PapaCambridge.com

## विभाग – 2

**4 पु.ल.देशपांडे – नाटक – सुंदर मी होणार**

**(अ)** 'सुंदर मी होणार' या नाटकातील प्रभावी स्वभावचित्रणाचे स्वरूप सोदाहरण स्पष्ट करा. [25]

**अथवा**

**(ब)** 'नाटक' ह्या कलाप्रकाराची विविध अंगे 'सुंदर मी होणार' मध्ये पुलंनी कशी कौशल्याने सुसंघटित केली आहेत ? साधार विशद करा. [25]

**5 मराठी लघुकथा – कथासंग्रह**

**(अ)** 'राधी'च्या निमित्ताने मानवी जीवनातील अटळ शोकात्मिकेचे भान जी.ए. कशाप्रकारे व्यक्त करतात ? साधार स्पष्ट करा. [25]

**अथवा**

**(ब)** 'मरण स्वस्त होत आहे' या कथेतील प्रभावी व्यक्तिचित्रणातून समाजाच्या अध:स्तरातील वेगळे विश्व कथाकार बागूल कशाप्रकारे उभे करतात ? [25]

**6 रणजित देसाई – कादंबरी – पावनखिंड**

**(अ)** 'कांदबरी' या वाड्.मयप्रकाराच्या प्रमुख घटकांच्या आधारे 'पावनखिंड' या कादंबरीचे साधार मूल्यमापन करा. [25]

**अथवा**

**(ब)** बाजी आणि शिवाजी ह्या दोन व्यक्तिरेखांच्या अंत:संबंधाचे सूत्र 'पावनखिंड' कादंबरीच्या प्रारंभापासून अंतापर्यंत कसे जपले जाते ? निवडक प्रसंगांच्या आधारे विश्लेषण करा. [25]

© UCLES 2012

BLANK PAGE

www.PapaCambridge.com

© UCLES 2012

BLANK PAGE

www.PapaCambridge.com

© UCLES 2012

**BLANK PAGE**

www.PapaCambridge.com

Permission to reproduce items where third-party owned material protected by copyright is included has been sought and cleared where possible. Every reasonable effort has been made by the publisher (UCLES) to trace copyright holders, but if any items requiring clearance have unwittingly been included, the publisher will be pleased to make amends at the earliest possible opportunity.

University of Cambridge International Examinations is part of the Cambridge Assessment Group. Cambridge Assessment is the brand name of University of Cambridge Local Examinations Syndicate (UCLES), which is itself a department of the University of Cambridge.

© UCLES 2012